# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

**(formerly University of Pune)**

## विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी प्राचार्य/अध्यापक/विद्यापीठ अध्यापक/महाविद्यालयीन परिसंस्थातील विभागप्रमुख यांची तात्पुरती मतदार यादी प्रसिध्द करणेबाबत.

**जाहिर प्रकटन**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(ण)[28(2)(o)] अन्वये १० प्राचार्य, कलम २८(२)(द)[28(2)(r)] अन्वये १० महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक आणि कलम २८(२)(ध)[28(2)(s)] अन्वये ०३ विद्यापीठ अध्यापक अधिसभेवर, कलम ३२(३)(छ)[32(3)(g)] अन्वये प्रत्येक विद्याशाखेचे ०२ अध्यापक विद्यापरिषदेवर व ४०(२)(ग)[40(2)(c)] अन्वये प्रत्येक अभ्यासमंडळावर ०३ महाविद्यालयीन/परिसंस्थांतील विभागप्रमुख यांना निवडून देण्याची तरतूद आहे. या निवडणुकीसाठी महाराष्ट्र शासनाने निर्गमित केलेले सन २०१७ चे एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ८ मधील तरतूदी अन्वये प्रत्येक गटाच्या तात्पुरत्या मतदार याद्या तयार करण्यात आलेल्या आहेत. तसेच त्रुटी असलेल्या अर्जाची यादी (त्रुटींसह) विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर सोमवार, दिनांक ०४ डिसेंबर, २०१७ रोजी प्रसिध्द केली आहे. प्राचार्य, महाविद्यालयीन/परिसंस्थांतील अध्यापक, विद्यापीठ अध्यापक, महाविद्यालयीन/ परिसंस्थांतील विभागप्रमुख मतदारांच्या नावांबाबत चूकीची नोंद असल्यास, नाव वगळले गेले असल्यास अथवा मतदार यादीत अन्य काही दुरुस्ती/आक्षेप असल्यास खालील नमूद केलेल्या पध्दतीने मंगळवार, दिनांक ०५ डिसेंबर, २०१७ ते शनिवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०१७ रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत विद्यापीठाच्या संकेतस्थळामार्फत ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. याप्रकारे सादर केलेल्या अर्जाची मुद्रित प्रत (हार्ड कॉपी) आवश्यक त्या दस्तऐवजांसह गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत विद्यापीठाच्या निवडणूक विभागाकडे प्रत्यक्ष अथवा पोस्टाद्वारे पाठविण्यात यावी. **तद्नंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच पोस्टाने पाठविलेले व विहित मुदतीनंतर प्राप्त अर्जांचाही विचार केला जाणार नाही.**

१) एखादा दस्तऐवज Upload केलेला नसल्यास किंवा चूकीचा दस्तऐवज Upload केलेला असल्यास यापूर्वी सादर केलेल्या माहितीमध्ये संदर्भ क्र. साफुपुविनि/१२५ दिनांक १४.०९.२०१७ अन्वये प्रसिध्द केलेल्या प्रकटनामध्ये नमूद केलेल्या पध्दतीनुसार विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने (**http://bcud.unipune.ac.in**) अर्जाचा क्रमांक नमूद केल्यास तो दस्तऐवज Upload करता येईल. अशाप्रकारे Upload केलेल्या दस्तऐवजाची व अर्जाची प्रत काढून (Printout) विहित मुदतीत विद्यापीठाकडे सादर करावी.

२) एखाद्या दस्तऐवजाची छायांकित प्रत मूळ अर्जासोबत सादर केलेली नसल्यास किंवा चूकीचा दस्तऐवज जोडलेला असल्यास आपल्या यापूर्वी सादर केलेल्या माहितीमध्ये संदर्भ क्र. साफुपुविनि/१२५ दि. १४.०९.२०१७ अन्वये प्रसिध्द केलेल्या प्रकटनामध्ये नमूद केलेल्या पध्दतीनुसार मंगळवार, दिनांक ०५ डिसेंबर, २०१७ ते शनिवार, दिनांक ०९ डिसेंबर, २०१७ रोजी, सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने (**http://bcud.unipune.ac.in**) दुरुस्ती करावयाची आहे. सदर संकेतस्थळावर अर्जाचा क्रमांक नमूद करावा व अर्ज अद्ययावत (Update) करावा आणि अशाप्रकारे अद्ययावत (Update) केलेल्या अर्जाची प्रत काढून (Printout) आवश्यक त्या दस्तऐवजांसह विहित मुदतीत विद्यापीठाकडे सादर करावी.

4/12/17

(डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

संदर्भ क्र. : साफुपुविनि/२८७
दिनांक : ०४ /१२/२०१७

D:\Election 2017\Teachers, PG Teachers, Principal\Notifiacation.docx